अहिल्यानगर महानगरपालिका
अहिल्यानगर, जा.क्र.- 324
विद्युत विभाग
दिनांक 26/11/2026

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

विद्युत विभाग

कोटेशन नोटीस

खालील तक्त्यात नमुद काम करावयाचे असल्याने विद्युत विभाग दि.27/11/2026 ते दि.03/12/2026 दरम्यान सदरील काम करणारे संस्थामार्फत कोटेशन मागवित आहे. इच्छुक ठेकेदार / संस्था यांनी सदरील कामाची कोटेशन नोटीस प्रसिध्द केल्यापासून दि.03/12/2026 रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत अहिल्यानगर मनपाच्या विद्युत विभागामध्ये जमा करावे. सर्वप्रथम कोटेशन धारक यांनी विद्युत विभागातील अभियंता यांचेमार्फत कामाबाबत पाहणी करून घ्यावी, अटीयुक्त कोटेशन फेटाळण्यात येईल.

कामाचा तपशिल	कामाची मुदत
अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले विविध इमारतींचे उर्जा लेखा परीक्षण करणेबाबत.	2 महिने

अटी व शर्ती

१. कोटेशन सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने (Technical व Commercial bid) करणे आवश्यक आहे.

२. निधी उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.

३. कोणतेही कोटेशन स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांना राहतील.

४. सुरक्षा ठेव निविदा रक्कमेच्या 5% इतकी राहिल. त्यापैकी करारनामा करतेवेळी 2.5% व 2.5% बिलातून रक्कम कपात करण्यात येईल

तांत्रिक लिफाफा क्र.१

१) इनकम टॅक्स प्रमाणपत्र प्रत मागील 1 वर्षाचे

२) पॅन कार्ड

३) G.S.T. रजिस्ट्रेशन

४) महाउर्जा कडील नोंदणीकृत उर्जा लेखा परीक्षण करणेबाबतचे प्रमाणपत्र.

५) समकक्ष केलेल्या कामाचे कार्यारंभ आदेश / वर्कडन सर्टिफिकेट.

६) ठेकेदार कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्थेकडुन काळ्या यादीत टाकण्यात आलेला नाही याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर मा. तहसिलदार / नोटरी पब्लिक यांचे कडील प्रतिज्ञा पत्र जोडणे आवश्यक आहे.

७) तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेबाबत प्रमाणपत्र.

उप अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

प्र.विद्युत विभाग प्रमुख

प्रत- १)हवलदार, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांना सदरची नोटीस बोर्डावर डकविण्याकरीता.

२)संगणक विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर यांना मनपाच्या वेबसाईट प्रसिध्द करणेकरीता.